# THE BOMBAY MERGED TERRITORIES AND AREAS (JAGIRS ABOLITION) ACT, 1953.

## (Bom. XXXIX of 1954)

## मुंबई विलीन प्रदेश व क्षेत्रें (जहागिऱ्या नाहीशा करण्याबाबत) अधिनियम, १९५३

### अनुक्रमणिका.


प्रस्तावना

| कलमें | | पान |
|---|---|---|
| १. | लघुसंज्ञा, व्याप्ति व सुरुवात ... | १२२१ |
| २. | व्याख्या ... | १२२१ |
| ३. | जहागिऱ्या नाहींशा करणें ... | १२२३ |
| ४. | जमीन महसूल देण्याबाबतची जहागीर गांवांची पात्रता ... | १२२४ |
| ५. | कोणते इसम खातेदार असतील ते ... | १२२४ |
| ६. | आजीव जिवाई जहागिरींत कोणते खातेदार असतील तें ... | १२२६ |
| ७. | आकारणीचे दर ... | १२२६ |
| ८. | जहागीर गांवांत असलेले सव सार्वजनिक रस्ते वगैरे सरकारमध्यें निहित होणें ... | १२२७ |
| ९. | झाडांसंबंधींचें हक्क ... | १२२७ |
| १०. | खाणी व खनिज पदार्थ यांवरील हक्क ... | १२२७ |
| ११. | जहागिरदारास नुकसानभरपाई ... | १२२७ |
| १२. | तहहयात जिवाई जागीरदारास नुकसानभरपाई ... | १२२८ |
| १३. | जहागीरदारास नुकसानभरपाई देण्याची रीत ... | १२२८ |
| १४. | इतर इसमाचे मालमत्तेंतील हक्क नाहींसे करणें, वगैरेबद्दल नुकसानभरपाई देण्याची रीत | १२२८ |
| १५. | सन १८९४ चा भूमि संपादन अधिनियम याचे उपबंध निर्णयास लागू असणें ... | १२२९ |
| १६. | कलेक्टरच्या निर्णयाविरुद्ध अपील ... | १२२९ |
| १७. | महसूल न्यायाधिकरणापुढें काम चालविण्याची रीत ... | १२२९ |
| १८. | मुदत ... | १२२९ |
| १९. | न्यायालय शुल्क ... | १२२९ |
| २०. | निवाड्याचे व महसूल न्यायाधिकरणाच्या निर्णयाचे अंतिमत्त्व ... | १२२९ |
| २१. | चौकशी व कामकाज हीं न्यायसंबंधीं कामें समजणें ... | १२२९ |
| २२. | नुकसानभरपाईची रक्कम हस्तांतरयोग्य रोख्यांच्या स्वरूपांत देण्याजोगी असणें ... | १२३० |
| २३. | जहागिरदारांनी कागदपत्र अधिकृत अधिकाऱ्याच्या स्वाधीन करणें ... | १२३० |
| २३-अ. | कायम धारण करणारे, इत्यादींकडून जहागीरदारानें किंवा कॅडेटनें विवक्षित बाबतींत वसूल केलेल्या अथवा त्यास मिळालेल्या रकमा सरकारला देण्याची जहागिरदाराची किंवा कॅडेटची जबाबदारी आणि अशी रक्कम ठरविणें. | १२३० |
| २४. | सन १९४८ चा मुंबई अधिनियम ६७, याचे उपबंध जमीनदार व कुळें यांच्यामधील संबंधांना लागू असणें. | १२३१ |
| २५. | नियम ... | १२३१ |
| २६. | बचाव ... | १२३१ |

# सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९.

[मुंबई विलीन प्रदेश व क्षेत्रें (जहागिऱ्या नाहींशा करण्याबावत) अधिनियम १९५३.]

[१८ जून १९५४]

हृया अधिनियमांत पुढील अधिनियमाअन्वयें सुधारणा करण्यांत आल्या आहेत.—

सन् १९५५ चा मुंबई अधिनियम ५१.

सन् १९५६ चा मुंबई अधिनियम ४० मुंबई विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

सन् १९५७ चा मुंबई अधिनियम ८.

सन् १९५८ चा मुंबई अधिनियम ५८.

सन् १९५८ चा मुंबई अधिनियम ८५.

सन् १९५९ चा मुंबई अधिनियम ५८.

## मुंबई राज्यांत विलीन झालेल्या क्षेत्रांतील व प्रदेशांतील जहागिऱ्या नाहींशा करण्याबाबत अधिनियम

ज्याअर्थी सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें मुंबई राज्यांत विलीन झालेल्या क्षेत्रांतील व प्रदेशांतील निरनिराळ्या प्रकारच्या जहागिऱ्या नाहींशा करणें व त्यास परिणामभूत व आनुषंगिक असलेल्या गोष्टींसाठी तरतूद करणें इष्ट आहे ; त्याअर्थी याअन्वयें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

लघुसंज्ञा, व्याप्ति व सुरुवात.

१. (१) या अधिनियमास मुंबई विलीन क्षेत्रें व प्रदेश (जहागिऱ्या नाहींशा करण्यासंबंधी) अधिनियम, १९५३, असें म्हणावें.

(२) तो दुसऱ्या राज्यांत घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यांतील विलीन झालेल्या क्षेत्रांना व प्रदेशांना लागू होतो.

(३) तो राज्य सरकार, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें याबाबत जी तारीख नेमील त्या तारखेस अंमलांत येईल.

व्याख्या.

२. विषयांत किंवा संदर्भात एतद्विरुद्ध कांहीं नसल्यास, हृया अधिनियमांत,—

(१) "नेमलेली तारीख" या संज्ञेचा अर्थ ज्या तारखेस हा अधिनियम अंमलांत येईल ती तारीख, असा समजावा ;

(२) "जमीन महसुल अधिनियम" या संज्ञेचा अर्थ मुंबई जमीन महसुल अधिनियम, १८७९ असा समजावा ;

(३) "कलेक्टर" या संज्ञेंत, राज्य सरकारनें, हृया अधिनियमान्वयें कलेक्टरचीं कामें पार पाडण्यासाठीं व त्याचे अधिकार चालविण्यासाठीं नेमलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होतो ;

(४) "जातीनें जमीन कसणें" या संज्ञेचा अर्थ स्वतःसाठीं—

(अ) स्वतःच्या अंगमेहनतीनें, अथवा

(ब) स्वतःच्या कुटुंबांतील कोणत्याहि इसमाच्या अंगमेहनतीनें, अथवा

(क) स्वतःच्या किंवा स्वतःच्या कुटुंबांतील कोणत्याहि इसमाच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं मजुरीनें कामावर लावलेल्या मजुरांकरवीं अथवा रोख रकमेंत किंवा मालाच्या रुपांत परंतु पिकाच्या हिश्श्याच्या रूपांत नव्हे, द्यावयाच्या वेतनावर ठेवलेल्या नोकरांकरवीं जमीन कसणें, असा समजावा.

स्पष्टीकरण.—हृया कंडिकेच्या प्रयोजनांकरितां—

(१) विधवा स्त्री, अवयस्क इसम किंवा शारीरिक किंवा मानसिक दौर्बल्य जडलेला इसम, हे आपली जमीन आपल्या नोकरांकरवीं किंवा मजुरीवर कामावर लावलेल्या मजुरांकरवीं कसीत असतील तर, ते अशी जमीन जातीनें कसतात असें समजलें पाहिजे ;

(२) अविभक्त हिंदु कुटुंबाच्या बाबतींत, जर अशी जमीन अशा कुटुंबांतील कोणत्याहि इसमाकडून कसण्यांत येत असेल तर, ती जमीन जातीनें कसण्यांत येते, असें समजलें पाहिजे.

(५) "घरखेड जमीन" या संज्ञेचा अर्थ, जहागीरदारानें आपली स्वतःची किंवा खाजगी मालमत्ता म्हणून धारण केलेली व त्याजकडून जातीनें कसण्यांत येत असलेली जमीन, असा समजावा ;

(६) "जहागीर" या संज्ञेचा अर्थ विलीनीकरणापूर्वी तत्कालीन शासनाधिकाऱ्यानें अनुदानाच्या स्वरूपांत किंवा अनुदान म्हणून मान्यता दिलेले एखादे गांव, गांवांचा गट किंवा एखाद्या गांवांचा भाग, असा समजावा, मग असें अनुदान जमिनीच्या स्वरूपांत असो किंवा अभिहस्तांकित जमीन महसुलाच्या स्वरूपांत असो किंवा दोन्ही स्वरूपांत असो ; व तींत

(अ) जिवाई जहागीर, भूमिया जहागीर, पतावर जहागीर, जमैया जहागीर, चाकरियात जहागीर, भागीमा किंवा सह-भागीदारांत विभागलेली जहागीर, खालसा जमीनदारी, मूळगिरास जहागीर, अक्ता, सरंजाम किंवा राजकीय इनाम या नांवानें सर्वसामान्यपणें ओळखल्या जाणाऱ्या सत्ताप्रकारानें विलीन झालेल्या क्षेत्रांत किंवा प्रदेशांत धारण केलेल्या,

(ब) पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यांत विलीन झालेल्या पूर्वीच्या भारतीय राज्याच्या संस्थाधिपतीनें विलीनीकरणापूर्वी आपल्या स्वतःच्या राज्यांत जहागीर म्हणून धारण केलेल्या व विलीनीकरणानंतर विलीनीकरण कबुलायतीन्वयें त्याच्या स्वतःच्या मालकीचो व त्याची खासगी मालमत्ता म्हणून त्याच्या उपयोगासाठीं व उपभोगासाठीं आहेत असें मान्य करण्यांत आलेल्या, किंवा

(क) विलीन झालेल्या तालुक्याच्या किंवा संपत्तीच्या तालुकदारानें धारण केलेल्या व विलीनीकरणकबुलायतीन्वयें त्याच्या स्वतःच्या मालकीचीं व त्याच्या उपयोगासाठीं व उपभोगासाठीं आहेत असें मान्य करण्यांत आलेल्या गांवांचा, गांवांच्या गटाचा किंवा भागांचा समावेश होतो ;

(७) "जहागीरदार" या संज्ञेचा अर्थ, जहागीर गांव धारण करणारा इसम, असा समजावा व तींत त्याच्या सहभागीदाराचा समावेश होतो ;

(८) "जहागीर गांव" या संज्ञेचा अर्थ, कंडिका ६ मध्यें व्याख्या केल्याप्रमाणें जहागीर म्हणून धारण केलेलें गांव किंवा गांवाचा भाग असा समजावा ;

(९) "जिवाई जहागीर" ह्या संज्ञेचा अर्थ, विलीन झालेल्या क्षेत्रांतील पूर्वीच्या भारतीय राज्याच्या संस्थाधिपतीनें किंवा विलीन झालेल्या तालुक्याच्या किंवा प्रदेशांतील संपत्तीचा तालुकदारानें दिलेल्या अनुदानावरून मग तें जिवाई म्हणून किंवा इतर कोणत्याहि नांवानें ओळखण्यांत येत असो गांव धारण करणाऱ्यानें स्वतःच्या उदरनिर्वाहाच्या कारणासाठीं धारण केलेलें गांव असा समजावा ;

(१०) "तहहयात जिवाई जहागीर" ह्या संज्ञेचा अर्थ, धारण करणाऱ्याच्या हयातीपर्यंत चालू ठेवण्याजोगी म्हणून राज्य सरकारनें याबाबत मान्यता दिलेली जिवाई जहागीर, असा समजावा ;

(११) "जिवाई जमीन" या संज्ञेचा अर्थ, जहागीरदाराच्या कुटुंबांतील इसमानें उदरनिर्वाहाच्या प्रयोजनासाठीं धारण केलेली जमीन, असा समजावा ;

(१२) "विलीनीकरण" या संज्ञेचा अर्थ पुढीलप्रमाणें आहे असें समजावें :—

(अ) पूर्वीच्या भारतीय राज्याच्या संबंधानें, अशा राज्याच्या संस्थाधिपतीनें अशा राज्याच्या शासनव्यवस्थेसंबंधींचो संपूर्ण व व्यावर्तक क्षेत्राधिकार व अधिकार हे, व अशा राज्याचा कारभार भारताचा अधिनियम, १९३५, कलम २९० अ, अन्वयें मुंबई राज्याकडे हस्तांतरित करणें ;

(ब) विलीन क्षेत्रांतील तालुक्याच्या किंवा संपत्तीच्या संबंधानें तालुकदारानें अशा तालुक्याचे किंवा संपत्तीचें कारभारविषयक किंवा कारभारासंबंधींचे सर्व हक्क, अधिकार व क्षेत्राधिकार हें मुंबई सरकारकडे हस्तांतरित करणें व असा तालुका किंवा संपत्ती ही, भारताचा अधिनियम, १९३५, कलम २९० अन्वयें मुंबई राज्यांत समावून घेणें ;

(१३) "विलीन प्रदेश" या संज्ञेचा अर्थ, यथास्थिति, मुंबई (प्रदेश वाढविण्याबाबत व हद्दी बदलण्याबाबत) आदेश १९४७, किंवा मुंबई (प्रदेश वाढविण्याबाबत व हद्दी बदलण्याबाबत) आदेश १९४८ किंवा मुंबई (प्रदेश वाढविण्याबाबत व हद्दी बदलण्याबाबत) (सुधारणा) आदेश, १९४८ याअन्वयें पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यांत समाविष्ट केलेले प्रदेश असा समजावा ;

(१४) "विलीनीकरण-कबुलायत" या संज्ञेचा अर्थ, ज्या कबुलायतीन्वयें पूर्वीचें भारतीय राज्य किंवा विलीन झालेल्या क्षेत्रांतील तालुका किंवा संपत्ती पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यांत विलीन करण्यांत आली असेल ती कबुलायत, असा समजावा ;

(१५) "बिन मालकीची जहागीर" या संज्ञेचा अर्थ, ज्या जहागिरींत जहागीरदारास, जहागिरीचा हक्क म्हणून, जहागीर गांवांत जमीन धारण करणाऱ्या इसमांकडून सरकारला येणें असलेल्या जमीनमहसुलाचा किंवा खंडाचा भाग वसूल करण्याचा हक्क असतो अशी जहागीर, असा समजावा परंतु तींत जमिनींवरील कोणताहि हक्क किंवा हितसंबंध ह्याचा अंतर्भाव होत नाहीं ;

(१६) "कायम धारण करणारा" ह्या संज्ञेचा अर्थ, जो इसम जहागीर गांवांतील जमीन किंवा जहागीरदाराच्या कुटुंबांतील इसमाकडून अशा गांवांतील जिवाई असून, यथास्थिति, जहागीरदारास किंवा त्याच्या कुटुंबांतील अशा इसमास रोकड किंवा मालाच्या स्वरूपांत आकारणी देऊन, परंतु खंड न देतां, धारण करतो तो इसम असा समजावा ; आणि तींत अशा इसमामार्फत किंवा त्याच्याकडून अशी जमीन धारण करणाऱ्या कोणत्याहि इसमाचा समावेश होतो ;

(१७) "विहित केलेलें" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वयें केलेल्या नियमांनीं विहित केलेलें, असा समजावा ;

(१८) "मालकीची जहागीर" या संज्ञेचा अर्थ, ज्या जहागिरीच्या संबंधांत जहागीरदारास, अनुदानाच्या किंवा कबुलायतीच्या शर्तीन्वयें किंवा रूढीनुसार किंवा वहिवाटीनें जमिनींवरील कोणताहि हक्क किंवा हितसंबंध उपभोगण्याचा हक्क असेल ती जहागीर असा समजावा ;

(२) जमीनमहसूल अधिनियमांत व्याख्या केलेल्या परंतु या अधिनियमांत व्याख्या न केलेल्या कोणत्याहि शब्दाचा किंवा शब्दप्रयोगाचा अर्थ त्यांना जमीनमहसूल अधिनियमांत जो अर्थ दिला असेल तोच अर्थ आहे असें समजण्यांत आलें पाहिजे.

(३) जहागिऱ्यांच्या आनुषंगिक गोष्टींसंबंधीं ह्या अधिनियमांत केलेले उल्लेख हे, या अधिनियमान्वयें जहागिऱ्या रद्द करण्यांत आलेल्या असल्या तरीहि नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वी उक्त आनुषंगिक गोष्टी ज्या स्वरुपांत चालू होत्या त्या स्वरुपांत त्यासंबंधींचे उल्लेख होत असे समजून त्याप्रमाणें त्याचा अर्थ लावण्यांत आला पाहिजे

(४) जर,—

(१) एखादी जहागिर मालकीची किंवा बिनमालकीची आहे यासंबंधीं,

(२) कोणतीहि जमीन घरखेड किंवा जिवाई आहे यासंबंधी किंवा

(३) कोणताहि इसम कायम धारेकरी आहे किंवा कसें यासंबंधीं ;

कोणताहि प्रश्न उद्‌भवेल तर , राज्य सरकारनें त्या प्रश्नाचा निर्णय दिला पाहिजे व असा निर्णय अखेरचा असेल परंतु, राज्य सरकारला उप-कंडिका (१), (२) व (३) यांपैकी कोणत्याहि उपकंडिकन्वयें उद्‌भवणाऱ्या प्रश्नाचा निर्णय देण्याचा अधिकार कोणत्याहि अधिकाऱ्यास देतां येईल व राज्यसरकारकडे करावयाच्या अपिलास अधीन राहून त्याचा निकाल अखेरचा असेल.

३. कोणतीहि वहिवाट, अनुदान, सनद, आदेश, कबुलायत किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेला कोणताहि विधी यांत कांहीहि असलें तरी नेमलेल्या तारखेस व त्या तारखेपासून — जहागिऱ्या नाहींशा करणें.

(१) सर्व जहागिऱ्या रद्द करण्यांत आल्या आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे;

(२) या अधिनियमाच्या उपबंधान्वयें स्पष्टपणें जी कोणतीहि तरतूद केलेली असेल ती खेरीज करून जमिनीचा खंड किंवा आकारणी वसूल करण्याचा किंवा कोणत्याहि प्रकारचा कर, उपकर, फी, आकार किंवा कोणताहि हक्क बसविण्याचा किंवा वसूल करण्याचा जहागिरदाराचा हक्क हा व जहागिरदाराकडे निहित असलेला, (कोणताहि असल्यास) उत्तराधिकार किंवा खालसा करण्याचा अधिकार व जहागिरीचे हक्क म्हणून, जहागिर गांवाच्या संबंधांत उक्त तारखेस वैधरित्या अस्तित्वांत असलेले जहागिरदाराचे किंवा कोणत्याहि इसमाचें इतर सर्व हक्क हे, रद्द करण्यांत आले आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे,

जमीन-महसूल देण्या-बाबतची जहागीर गांवांची पात्रता.

४. सर्व जहागिर गांवें ही जमीनमहसूल अधिनियमाच्या व त्या अन्वयें केलेल्या नियमांच्या उपबंधांनुसार जमीन महसूल देण्यास पात्र असतील व बिनदुमाला जमिनीसंबंधीचे जमीनमहसूल अधिनियांतील नियमांचें उपबंध अशा गांवांना लागू असतील ;

परंतु , या कलमांतील कोणत्याहि मजकुरामुळें,—

(१) कोणतेहि देवस्थान इनाम किंवा धार्मिक अथवा धर्मार्थ संस्थांनी धारण केलेली इनामें किंवा

(२) सरकारास उपयुक्त अशा सेवेबद्दल धारण केलेली इनामें यांस बाध येतो असें समजतां कामा नये.

स्पष्टीकरण.—ह्या कलमाच्या कारणाकरितां धार्मिक किंवा धर्मादाय संस्थेसाठीं धारण केलेले इनाम म्हणजे धार्मिक किंवा धर्मादाय संस्थेसाठीं विलीनीकरणापूर्वी त्या वेळच्या शासनाधिकाऱ्यानें दिलेले किंवा देणगी म्हणून मान्यता दिलेले आणि विलीनीकरणापूर्वी संबंधित भारतीय संस्थानांत याबाबत ठेवलेल्या कागदपत्रांत तसें इनाम म्हणून दाखल केलेलें इनाम होय.

कोणते इसम खातेदार असतील तें.

५. (१) मालकीच्या जहागिर गांवांत,—

(अ) जहागिरदारानें धारण केलेल्या घरखेड जमिनीच्या बाबतींत, असा जहागीरदार हा,

(ब) घरखेड जमिनीव्यतिरिक्त जी इतर जमीन जहागीरदाराच्या प्रत्यक्ष कबजांत असेल किंवा कायम धारण करणारा खेरीजकरून जहागीरदारामार्फत किंवा जहागीरदाराकडून धारण करणाऱ्या इसमाच्या कबजांत असेल त्या जमिनीच्या बाबतींत असा जहागीरदार हा,

(क) जहागीरदाराच्या कुटुंबांतील इसमानें धारण केलेल्या जिवाई जमिनीच्या बाबतींत,

(१) जर अशी जमीन त्या इसमाच्या कबजांत असेल व तो स्वतः ती कसीत असेल तर किंवा कायम धारण करणारा खेरीज करून इतर इसमांच्या कबजांत असून (जहागीरदाराच्या कुटुंबांतील) त्या इसमामार्फत किंवा त्याच्याकडून तो धारण करीत असेल तर जहागीरदाराच्या कुटुंबांतील असा इसम हा, व

(२) जर अशी जमीन कायम धारण करणाऱ्यानें धारण केलेली असेल तर, असा कायम धारण करणारा हा, व

(३) कायम धारण करणाऱ्यानें धारण केलेल्या जमिनीच्या बाबतींत, असा कायम धारण करणारा हा, अशा जमिनीच्या संबंधानें राज्यसरकारला देणें असलेला जमीन महसूल देण्याबद्दल प्रथमतः जबाबदार असेल व जमीन महसूल अधिनियम किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेला इतर कोणताहि विधि याअन्वयें खातेदार म्हणून त्यास अशा जमिनी संबंधानें सर्व हक्क असतील व तो सर्व जबाबदारीस पात्र असेल :

परंतु, कंडिका (ब) किंवा कंडिका (क), उपकंडिका (१) हींत उल्लेख केलेल्या जमिनीच्या बाबतींत, जर ती जमीन यथास्थिति, जहागीरदारास किंवा जहागीरदाराच्या कुटुंबांतील इसमास खंड दिल्यानंतर जहागीरदारामार्फत किंवा जहागीरदाराकडून किंवा त्याच्या कुटुंबांतील इसमामार्फत किंवा

त्याच्याकडून धारण करणाऱ्या इसमाच्या कबजांत असेल तर, अशा इसमास अशा जमिनीवरील ठरविलेल्या आकारणीच्या सहापटीइतके भोगाधिकार मूल्य विहितकेलेल्या रीतीनें, यथास्थिति, जहागीर-दारास किंवा त्याच्या कुटुंबांतील इसमास दिल्यानंतर त्यास खातेदार म्हणून अशा जमिनीसंबंधानें सर्व हक्क असतील ;

पोट-कलम (१ अ) आणि (१ ब) यांच्या उपबंधांस अधीन राहून तसेंच, वरील परन्तुकान्वयें प्रदान केलेला हा हक्क नेमलेल्या तारखेपासून सहा वर्षांच्या मुदतीनंतर चालवितां येणार नाही.

"(१-अ) जेव्हां कोणत्याहि जहागीर गांवाच्या संबंधांत, या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी, एखाद्या न्यायालयानें दिलेल्या मनाई-हुकुमाचें पालन करतांना स्थगित करण्यांत आली असेल आणि असा मनाई-हुकूम मागाहून रद्द करण्यांत आला असेल, तेव्हां, पोट-कलम (१) याची कंडिका (ब) किंवा कंडिका (क), उप-कंडिका (१) यांत उल्लेख केलेल्या अशा जहागीर गांवांतील कोणत्याहि जमिनीच्या बाबतींत, उक्त पोट-कलमाच्या परंतुकानुसार अशा जमिनीचा खातेदार म्हणून राहण्याचा हक्क असलेला इसम हा,—

(१) मनाई-हुकूम देण्यापूर्वी त्यानें पोट-कलम (१) च्या पहिल्या परंतुकानुसार भोगाधिकारमूल्य अगोदरच दिलें असेल तर, किंवा

(२) मनाई-हुकूम अंमलांत असतांना, जहागीरदारानें किंवा कॅडेटनें जी कोणतीहि खंडाची रक्कम, जर कोणतीहि असल्यास, वसूल केली असेल किंवा त्यास मिळाली असेल त्या खंडाच्या रकमेचा अशा भोगाधिकारमूल्याच्या संपूर्ण रकमेशीं पोट-कलम (१-ब) अन्वयें, मेळ घालतां येत असेल तर, किंवा

(३) तो असें भोगाधिकारमूल्य किंवा पोट-कलम (१-ब) यांत तरतूद केल्याप्रमाणें (रकमेचा) मेळ घातल्यानंतर उक्त मूल्याची देणें म्हणून बाकी राहिलेली शिल्लक रक्कम—

(अ) ज्या तारखेस मनाई-हुकूम रद्द करण्यांत आला असेल त्या तारखेपासून, किंवा

(ब) मुंबई विलीन प्रदेश व क्षेत्रें (जहागिरी रद्द करण्याबाबत) (सुधारणा) अधिनियम, १९५९ याच्या प्रारंभापूर्वी मनाई-हुकूम रद्द करण्यांत आला असेल तर अशा प्रारंभाच्या तारखेपासून,—

—तीन महिन्यांचे आंत देईल तर,

—ज्या तारखेस मनाई-हुकूम देण्यांत आला असेल त्या तारखेपासून अशा जमिनीचा खातेदार आहे असें समजण्यांत आलें पाहिजे.

(१-ब) पोट-कलम (१) ची कंडिका (ब) किंवा कंडिका (क) ची उप-कंडिका (१) यांत उल्लेखि-लेल्या कोणत्याहि जमिनीच्या संबंधांत, यथास्थिति, जहागीरदारानें किंवा कॅडेटनें, असा मनाई-हुकूम अंमलांत असतांना, खंड देण्याच्या शर्तीवर अशी जमीन धारण करणाऱ्या इसमाकडून खंड म्हणून कोणतीहि रक्कम वसूल केली असेल किंवा त्यास अशी रक्कम मिळाली असेल तर, अशा रीतीनें वसूल केलेल्या किंवा मिळालेल्या खंडाच्या रकमेचा, अशा जमिनीच्या संबंधांत जहागीरदारानें किंवा कॅडेटनें दिलेल्या आकारणी इतकी रक्कम त्यांतून वजा केल्यानंतर, पोट-कलम (१) च्या पहिल्या परंतुकानुसार त्या इसमानें द्यावयाच्या भोगाधिकारमूल्याशीं मेळ घातला पाहिजे आणि, यथास्थिति, जहागीरदारानें किंवा कॅडेटनें अशा रीतीनें (रकमेचा) मेळ घातल्यानंतर उरणारी शिल्लक रक्कम—जर कोणतीहि असल्यास—अशा इसमास विहित केलेल्या मुदतींत, परत केली पाहिजे. जर जहागीरदार किंवा कॅडेट शिल्लक रक्कम परत करण्यांत कसूर करील तर, उक्त रक्कम जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणें त्याजकडून वसूल करण्यांत आली पाहिजे आणि अशा इसमास दिली पाहिजे.

(२) बिन-मालकीच्या जहागीर गांवांत—

(अ) जहागीरदारानें धारण केलेल्या घरखेड जमिनीच्या बाबतींत, असा जहागीरदार हा,

(ब) कायम धारण करणाऱ्यानें धारण केलेल्या जमिनीच्या बाबतींत, असा कायम धारण करणारा हा, व

(क) नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वी जहागीर सत्ता प्रकाराच्या आनुषंगिक गोष्टी म्हणून जहागीरदारास खंड देण्यास जबाबदार असलेल्या इसमाच्या कबजांतील जमिनीच्या बाबतींत, असा इसम हा,

अशा जमिनीच्या संबंधांत राज्य सरकारला देणें असलेला जमीनमहसूल देण्याबाबत प्रथमतः जबाबदार असेल व जमीन महसूल अधिनियम किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेला इतर कोणताहि विधि या अन्वयें खातेदार म्हणून त्यास अशा जमिनीच्या संबंधानें सर्व हक्क असतील व तो सर्व जबाबदाऱ्यास पात्र असेल

परंतु, कंडिका (क) मध्यें निर्दिष्ट केलेली जमीन धारण करणारा इसम, अशा जमिनीवरील आकारणीच्या सहापटीइतके भोगाधिकार मूल्य राज्यसरकारास दिल्यानंतर त्यास खातेदार म्हणून अशा जमिनीच्या संबंधानें सर्व हक्क असतील.

आणखी असें की, जर असा इसम विहित केलेल्या मुदतींत भोगाधिकार मूल्य देण्यांत कसूर करील तर, ती जमीनमहसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्याजोगी असेल.

(३) ह्या कलमांतील कोणताहि मजकूर आजीव जिवाई जहागिरीस लागू आहे असें समजण्यांत येतां कामा नये.

आजीव जिवाई जहागिरींत कोणते इसम खातेदार असतील तें.

६. एखाद्या आजीव जिवाई जहागीर गांवांत,—

(अ) जहागीरदारानें धारण केलेल्या घरखेड जमिनीच्या बाबतींत, असा जहागीरदार हा,

(ब) कायम धारण करणाऱ्यानें धारण केलेल्या जमिनींच्या बाबतींत, असा कायम धारेकरी हा, व

(क) नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्व जहागीर सत्ताप्रकारास आनुषंगिक असलेल्या गोष्टी म्हणून जहागीरदारास खंड देण्यास जबाबदार असलेल्या इसमाच्या कबजांतील जमिनीच्या बाबतींत असा इसम हा, अशा जमिनीच्या संबंधानें राज्य सरकारला देणें असलेला जमीन महसूल देण्याबद्दल प्रथमतः जबाबदार असेल व जमीन महसूल, अधिनियमांत किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेला इतर कोणताहि विधि या अन्वयें खातेदार म्हणून त्यास अशा जमिनीच्या संबंधानें सर्व हक्क असतील व तो सर्व जबाबदाऱ्यास पात्र असेल ;

परंतु, कंडिका (क) मध्यें निर्दिष्ट केलेली जमीन धारण करणारा इसम, अशा जमिनींवरील ठरविलेल्या आकारणींच्या सहा पटीं इतके भोगाधिकार मूल्य राज्यसरकारास दिल्यानंतर खातेदार म्हणून त्यास अशा जमिनीच्या संबंधानें सर्व हक्क असतील. आणखी असें कीं, जर असा इसम विहित केलेल्या मुदतींत भोगाधिकार मूल्य देण्यांत कसूर करील तर, ती जमीनमहसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्याजोगी असेल.

आकारणीचे दर.

७. जमीनमहसूल अधिनियमाचें विभाग ८ व ८-अ अन्वयें जहागीर गांवांत महसूल पाहणी व जमीनमहसुलाची व्यवस्था करण्यांत येईपर्यंत, कलम ५ किंवा ६ अन्वयें कोणत्याहि जमिनीच्या संबंधांत राज्य सरकारास द्यावयाचा जमीनमहसूल हा, नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वी अशा जमिनीच्या संबंधांत जहागीरदारास ज्या दरानें आकारणी दिली जात होती त्या दरानें दिला पाहिजे.

परंतु, ज्या कोणत्याहि जमिनीच्या संबंधांत, आकारणी ठरविण्यांत आली नसेल त्या जमिनीच्या बाबतींत किंवा कोणत्याहि जमिनीच्या संबंधांत ठरविलेले आकारणीचे दर हे, राज्यसरकारच्या मतें, जमीनमहसूल अधिनियमाचा विभाग ८-अ अन्वयें राज्याच्या इतर क्षेत्रांत आकारणीचें जे प्रमाणभूत दर ठरविलेलें असतील त्याशीं सुसंगत नसतील तेव्हां, राज्यसरकारनें, आकारणीचे असे प्रमाणभूत दर विचारांत घेऊन अशा जमिनीच्या संबंधांत आकारणीचे दर, यथास्थिति, ठरविणें किंवा त्यांत बदल करणें हे विधिसम्मत असेल.

व कलम ५ किंवा ६ अन्वयें जमीनमहसूल देण्यास जबाबदार असलेल्या इसमानें अशा रीतीनें ठरविलेल्या किंवा बदललेल्या दरानें जमीनमहसूल दिला पाहिजे.

**जहागीर गांवांत असलेले सर्व सार्वजनिक रस्ते वगैरे सरकारमध्यें निहित होणें.**

८. कोणत्याहि जहागीर गांवाच्या हद्दींत असलेले सर्व सार्वजनिक रस्ते, गल्ल्या व वाटा व त्यावरील किंवा त्याजवळील सर्व पूल, चर, धरणें, कुंपणें व भरतीच्या पाण्याच्या खुणेच्या खालील समुद्राचा, बंदराचा व खाड्यांचा तळ व नद्यांचा, ओढ्यांचा, नाल्यांचा, सरोवरांचा, विहिरींचा व तळ्यांचा तळ व सर्व कालवे व पाण्याचे पाट व सर्व सांचलेलें व वाहतें पाणी (इमारतीसाठीं किंवा इतर कोणत्याहि बिनशेतकीविषयक कारणासाठीं उपयोगांत आणलेल्या जमिनी खेरीजकरून) घरें न बांधलेल्या गांवठाणांतील सर्व जमिनी, सर्व पडीत जमिनी व लागवडीखाली न आणलेल्या सर्व जमिनीं हीं, त्यांत किंवा त्यांवर जहागीरदारा-व्यतिरिक्त इतर कोणत्याहि इसमाचे कोणतेहि हक्क प्रस्थापित करण्यांत येतील ते खेरीजकरून व त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणताहि विधि याअन्वयें अन्यथा जी कोणतीहि तरतूद केली असेल ती खेरीज-करून त्यांत किंवा त्यावर असलेल्या किंवा त्यांच्या असलेल्या सर्व हक्कांसह, राज्यसरकारची मालमत्ता असेल व आहे असें समजण्यांत आले पाहिजे व अशा मालमत्तेमध्यें जहागीरदारानें धारण केलेले सर्व हक्क हे रद्द झाले आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे व कलेक्टरनें, राज्य सरकारच्या सामान्य किंवा खास आदेशास अधीन राहून, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणें, जनतेला किंवा व्यक्तींना वैध रीतीनें असलेले जाण्या-येण्याचे व इतर हक्क यांस नेहमीं अधीन ठेवून त्यांची विल्हेवाट लावणें हें विधिसंमत असेल.

स्पष्टीकरण.—ह्या कलमाच्या प्रयोजनांकरितां कोणतीहि जमीन जर, ती नेमलेल्या तारखेच्या निकट-पूर्वी लागोपाठ तीन वर्षांच्या मुदतीपर्यंत लागवडीखालीं आणलेली नसेल तर ती पडीत (लागवडीखाली न आणलेली) जमीन आहे असें समजण्यांत आलें पाहिजे.

**झाडां-संबंधीचें हक्क.**

९. राज्य सरकारनें त्या त्या वेळीं अंमलांत असलेला कोणताहि करार, अनुदान किंवा कायद्यान्वयें ज्यांची मालकी हस्तांतरित केली असेल अशा झाडांव्यतिरिक्त भारतीय जंगल अधिनियम, १९२७ किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेला इतर कोणताहि विधि, याअन्वयें खास राखून ठेवलेल्या झाडांवरील हक्क हा राज्यसरकारमध्यें निहित होईल व ह्या अधिनियमांतील कोणत्याहि मजकुरामुळें, दुसऱ्या राज्यांत घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यांत अंमलांत असलेला भारतीय जंगल अधिनियम, १९२७ याचे उपबंध जहागीर गांवांतील जंगलांस लागू करण्याचा राज्यसरकारच्या हक्कास कोणत्याहि प्रकारें बाध येणार नाहीं.

**खाणी व खनिज पदार्थ यांवरील हक्क.**

१०. ह्या अधिनियमांतील किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेला इतर कोणताहि विधि यांतील कोणत्याहि मजकुरामुळें नेमलेल्या तारखेस, त्या त्या वेळीं अंमलांत असलेला कोणताहि करार, अनुदान किंवा विधि याअन्वयें किंवा कोणत्याहि रूढीनें किंवा वहिवाटीनें देण्यांत आलेले किंवा मान्य करण्यांत आलेले जहागीर गांवांतील खाणीवर किंवा खनिज पदार्थांवर जहागीरदारास जे हक्क असतील त्या हक्कांस बाध येतो असें समजतां कामा नये.

**जहागीर-दारास नुकसान-भरपाई देणें.**

११. (१) बिन-मालकी जहागिरीच्या बाबतींत, जहागीरदारास, नेमलेल्या तारखेच्या निकट पूर्वीच्या पांच वर्षांत जहागिरीचा हक्क म्हणून जहागीरदारास मिळालेल्या किंवा येणें असलेल्या जमीन-महसुलाच्या सरासरी रकमेच्या तिप्पट दरानें नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असेल.

(२) मालकी जहागिरीच्या बाबतींत, कायम धारण करणारानें धारण केलेल्या जमिनीच्या संबंधांत जहागीरदारास अशा जमिनीसाठीं ठरविण्यांत आलेल्या आकारणीच्या तीन पटीइतकी नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असेल.

(३) कलम ८ मध्यें निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि मालमत्तेत कोणताहि हक्क किंवा हितसंबंध असलेल्या कोणत्याहि जहागीरदारास, त्याचा असा हक्क किंवा हितसंबंध होता असें कलेक्टरची खात्री होईल अशा रीतीनें त्यानें सिद्ध केल्यास, पुढील रीतीनें नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असेल :—

(१) जर संबंधित मालमत्ता पडित किंवा लागवडीखाली न आणलेली परंतु लागवडीखालीं आणण्याजोगी जमीन असेल तर नुकसानभरपाईची रक्कम ही, त्या जमिनीच्या आकारणीच्या तिप्पटीहून अधिक असतां कामा नये ;

परंतु, जर त्या जमिनीवर आकारणी करण्यांत आलेली नसेल तर, नुकसानभरपाईची रक्कम ही त्याच कारणासाठीं उपयोगांत आणलेल्या त्याच प्रकारच्या तेवढ्याच क्षेत्रफळाच्या जमिनीवर त्याच गांवांत बसविण्याजोग्या आकारणीच्या रकमेपेक्षां अधिक असतां कामा नये.

(२) जर संबंधित मालमत्ता ही, जिच्यावर लोक जाण्यायेण्याचा हक्क उपभोगीत आहेत किंवा त्यांनीं असा हक्क संपादन केला आहे किंवा जिच्यावर कोणत्याहि व्यक्तीचा वहिवाटीचा हक्क आहे, अशी जमीन असेल तर नुकसानभरपाईची रक्कम, जमीनमहसूल अधिनियमाअन्वयें केलेल्या नियमास अनुसरून, लागवडीखालीं न आणलेल्या जमिनीवर, त्या गांवांत बसविण्याजोग्या वार्षिक आकारणीच्या रकमेपेक्षां जास्त असतां कामा नये किंवा जर अशा नियमांत अशी आकारणी बसविण्याची तरतूद केलेली नसेल, तर कलेक्टरच्या मताप्रमाणें, दावेदारानें केलेल्या हक्काची किंवा हितसंबंधाची बाजारभावाप्रमाणें जी किंमत असेल त्या किंमतीपेक्षां अधिक असतां कामा नये.

(३) जर त्या जमिनीवर कोणतीहि झाडें असतील किंवा कोणतेहि बांधकाम केलें असेल तर नुकसानभरपाईची रक्कम, यथास्थिति, अशीं झाडें किंवा असें बांधकाम यांची बाजारभावाप्रमाणें जी किंमत असेल त्या किंमतीइतकी असेल.

स्पष्टीकरण.—ह्या कलमाच्या प्रयोजनांकरितां, "बाजार किंमत" या संज्ञेचा अर्थ, भूमि संपादन अधिनियम, १८९४, कलम २३, पोट-कलम (१) व कलम २४ यांचे उपबंध हे, जेथवर लागू असतील तेथवर त्यांस अनुसरून अंदाज केल्याप्रमाणेंची किंमत असा समजावा.

तहहयात जिवाई जहागीरदारास नुकसान भरपाई.

१२. आजीव जिवाई जहागीरीच्या बाबतींत, जहागीरदारास, अशा जहागिरींतील त्याचे सर्व हक्क रद्द केल्याबद्दल नेमलेल्या तारखेच्या निकट पूर्वीच्या पांच वर्षांत जहागीर सत्ता प्रकाराचा हक्क म्हणून जहागीरदारास मिळालेल्या किंवा येणें असलेल्या जमीनमहसुलाच्या सरासरी रकमेच्या दहापटीं इतक्या दरानें नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असेल व त्यास ह्या अधिनियमाअन्वयें देण्याजोगी इतर कोणतीहि नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असणार नाहीं.

जहागीरदारास नुकसान-भरपाई देण्याची रीत.

१३. (१) कलम ११ किंवा १२ अन्वयें नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असलेल्या कोणत्याहि जहागीदारानें तारीख ३१ जुलै १९५८ रोजीं किंवा तत्पूर्वी, उक्त कलमान्वयें त्यास देण्याजोगी नुकसानभरपाईची रक्कम ठरविण्यासाठीं कलेक्टरकडे लेखी अर्ज केला पाहिजे.

(२) पोट-कलम (१) अन्वयें अर्ज मिळाल्यानंतर कलेक्टरनें, जमीन महसूल अधिनियमांत तरतूद केलेल्या रीतीनें रीतसर चौकशी केल्यावर, नुकसानभरपाईची रक्कम ठरविणारा निवाडा केला पाहिजे. जेव्हां नुकसानभरपाईसाठीं दावेदार जहागिरदाराचा एखादा सहभागीदार असेल तेव्हां, कलेक्टरनें आपल्या निवाड्यांत जहागीरदार व सहभागीदार यांच्यामध्यें नुकसानभरपाईची रक्कम विभागून दिली पाहिजे.

इसमाचे इतर मालमत्तेतील हक्क नाहीसे करणें, वगैरेबद्दल नुकसान-भरपाई देण्याची रीत.

१४. (१) ह्या अधिनियमाच्या उपबंधांपैकी कोणत्याहि उपबंधामुळें, जर जहागीरदाराखेरीज इतर कोणत्याहि इसमाचे मालमत्तेतील त्याचे कोणतेहि हक्क किंवा हितसंबंध नष्ट होऊन किंवा त्यांत फेरफार होऊन त्याचे नुकसान झालें असेल आणि अशा रीतीनें (हक्क किंवा हितसंबंध) रद्द करण्यामुळें, नष्ट करण्यामुळें किंवा फेरबदल केल्यामुळें या अधिनियमाच्या उपबंधांत नुकसान भरपाई देण्याची तरतूद करण्यांत आली नसेल तर, अशा इसमास, नुकसान भरपाई मिळण्यासाठीं कलेक्टरकडें अर्ज करण्याचा अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) अन्वयेंचा अर्ज, तारीख ३१ जुलै १९५८ रोजीं किंवा तत्पूर्वी विहित केलेल्या नमुन्यांत कलेक्टरला सादर केला पाहिजे. कलेक्टरनें जमीन महसूल अधिनियमांत विहित केलेल्या रीतीनें रीतसर चौकशी केल्यानंतर, भूमि संपादन अधिनियम, १८९४, कलम २३, पोट-कलम (१) व कलम २४ यांत तरतूद केलेल्या रीतीनें व पद्धतीस अनुसरून नुकसानभरपाई ठरविण्याबाबत निवाडा दिला पाहिजे.

१५. कलम १३ किंवा १४ या अन्वयें दिलेला प्रत्येक निवाडा हा, भूमि संपादन अधिनियम, १८९४ कलम ६ यांत विहित केलेल्या नमुन्यांत असला पाहिजे आणि उक्त अधिनियमाचे उपबंध, शक्य तेथवर, अशा निवाड्यास लागू असतील. सन १८९४ चा भूमि संपादन अधिनियम याचे उपबंध निर्णयास लागू असणें.

१६. कलेक्टरच्या निर्णयाविरुद्ध, मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९३९ याअन्वय रचना केलेल्या मुंबई महसूल न्यायाधिकरणाकडें, उक्त अधिनियमांत कोणतेहि उपबंध असले तरीहि, अपील करण्याचा अधिकार आहे. कलेक्टरच्या निर्णयाविरुद्ध अपील.

१७. (१) मुंबई महसूल न्यायाधिकरणानें अपील करणारा व राज्य सरकार यांस नोटीस दिल्यानंतर, अपिलाचा निर्णय दिला पाहिजे व आपल्या निर्णयाची नोंद केली पाहिजे. महसूल न्यायाधिकरणापुढें काम चालविण्याची रीत.

(२) या अधिनियमाअन्वयें केलेल्या अपिलाचा निर्णय करतांना मुंबई महसूल न्यायाधिकरणानें, व्यवहार प्रक्रिया संहिता १९०८ अन्वयें मूळ न्यायालयानें दिलेल्या हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर केलेल्या अपिलांचा निर्णय करतांना न्यायालयास जे अधिकार असतील ते सर्व अधिकार चालविले पाहिजेत व न्यायालय जी कार्यरीति अनुसरतें तीच रीत अनुसरली पाहिजे.

१८. या अधिनियमाअन्वयें मुंबई महसूल न्यायाधिकरणाकडें करावयाचें प्रत्येक अपील, कलेक्टरच्या निर्णयाच्या तारखेपासून साठ दिवसांच्या मुदतींत दाखल केलें पाहिजे. भारतीय मुदत अधिनियम, १९०८, कलमें ४, ५, १२ आणि १४ यांचे उपबंध असें अपील दाखल करण्यास लागू असतील. मुदत.

१९. न्यायालय शुल्क अधिनियम, १८७०, यांत कांहिही असलें तरी या अधिनियमान्वयें मुंबई महसूल न्यायाधिकरणाकडें करण्यांत आलेल्या प्रत्येक अपिलावर विहित केला असेल इतक्या किंमतीचा न्यायालयशुल्क मुद्रांक लावला पाहिजे. न्यायालय शुल्क.

२०. मुंबई महसूल न्यायाधिकणाकडे करावयाच्या अपिलास अधीन राहून कलेक्टरनें केलेला निवाडा व मुंबई महसूल न्यायाधिकरणानें अपिलावर दिलेला निर्णय अखेरचा व निर्णायक असेल आणि त्यास कोणत्याहि न्यायालयांतील कोणत्याहि दाव्यांत किंवा कामकाजांत आक्षेप घेतां कामा नये. निवाड्याचे व महसूल न्यायाधिकरणाच्या निर्णयाचे अंतिमत्व.

२१. या अधिनियमाअन्वयें कलेक्टर व मुंबई महसूल न्यायाधिकरण यांजपुढें चालू असलेलें सर्व चौकशीचें व इतर कामकाज हें, भारतीय दंड संहितेची कलमें १९३, २१९ व २२८ यांच्या अर्थानुसार न्यायसंबंधी कामकाज आहे असें समजण्यांत आलें पाहिजे. चौकशी व कामकाज हीं, न्यायासंबंधीं कामें समजणें.

नुकसान-भरपाईची रक्कम हस्तांतरयोग्य रोख्यांच्या स्वरूपांत देण्याजोगी असणें.

२२. या अधिनियमाच्या उपबंधाअन्वयें देण्याजोगी नुकसानभरपाईची रक्कम हस्तांतरित करण्या-जोग्या रोख्यांच्या स्वरूपांत देण्याजोगी असेल आणि त्यांवर, असें रोखे दिल्याच्या तारखेपासून दरसाल दरशेंकडा तीन टक्के या दरानें व्याज मिळेल आणि त्यांची रक्कम, असें रोखे दिल्याच्या तारखेपासून वीस वर्षांच्या मुदतींत, मुद्दल व व्याज यांच्या समान वार्षिक हप्त्यांनीं फेड करण्याजोगी असेल. असें रोखे विहित करण्यांत येतील इतक्या दर्शनी किंमतीचे व अशा नमुन्यांत असतील.

जहागिरदारांनीं कागदपत्र अधिकृत अधिकाऱ्याच्या स्वाधीन करणें.

२३. (१) जेव्हां जेव्हां राज्यसरकारनें याबाबतींत अधिकृत केलेला अधिकारी निदेश देईल तेव्हां तेव्हां, जहागिरदारानें, जहागीर गांवाच्या संबंधांत त्यानें ठेवलेलें कागदपत्र अशा अधिकाऱ्याच्या किंवा त्या निदेशांत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा इतर अधिकाऱ्यास स्वाधीन केलें पाहिजे.

(२) जर जहागिरदार वाजवी कारणावांचून असें दफ्तर स्वाधीन करण्यांत कसूर करील तर, त्यास, तो दोषी ठरविण्यांत आला असतां, पराकाष्ठा दोनशें रुपये दंडाची शिक्षा होईल. असें दफ्तर स्वाधीन करण्यांत कसूर करणें चालू ठेवल्याच्या बाबतींत, पहिल्या कसुराबद्दल, तो दोषी ठरविण्यांत आल्यानंतर कसूर करण्याचें चालू ठेवलेल्या प्रत्येक दिवसाबद्दल पराकाष्ठा पंचवीस रुपये जादा दंडाची शिक्षा होईल.

कायम धारण करणारे, इत्यादींकडून जहागीरदारानें किंवा कॅडेटनें विवक्षित बाबतींत वसूल केलेल्या अथवा त्यास मिळालेल्या रकमा सरकारला देण्याची जहागीरदाराची

" २३-अ (१) एखाद्या जहागीर गांवातील ज्या जमिनीच्या बाबतींत जहागिरदार किंवा त्याच्या कुटुंबांतील कॅडेट खेरीज करून इतर कोणताहि इसम नेमलेल्या तारखेपासून कलम ५ किंवा ६ अन्वयें जमीन महसूल राज्य सरकारला देण्याबद्दल प्रथमतः जबाबदार झाला असेल त्या जमिनीच्या बाबतींत जर जहागिरदारानें किंवा यथास्थिति कॅडेटनें नेमलेल्या तारखेनंतर कोणत्याहि मुदतीकरितां अशा जमिनीचा जमीनमहसूल किंवा खंड म्हणून कोणतीहि रक्कम अशा इसमाकडून वसूल केली असेल किंवा त्यास मिळाली असेल, तर अशा जहागिरदानें किंवा कॅडेटने मुंबईचा विलीन झालेलें मुलूख आणि प्रदेश (जहागिऱ्या रद्द करण्यासंबंधीं) (सुधारणा) अधिनियम, १९५७ अंमलात येण्याच्या तारखेपासून ३ महिन्याच्या मुदतीच्या आंत, अशा रीतीनें वसूल केलेल्या किंवा मिळालेल्या जमीनमहसुलाच्या किंवा खंडाच्या रकमेइतकी रक्कम राज्य सरकारला दिली पाहिजे.

(१-अ) (अ) जेव्हां एखाद्या जहागीर गांवांतील कोणत्याहि जमिनीच्या बाबतींत, जहागीरदार
किंवा त्याच्या कुटुंबांती [illegible] खेरीजकरून इतर कोणताहि इसम, नेमलेल्या तारखेपासून, कलम ५ किंवा ६
अन्वयें राज्य [illegible] वसूल देण्याबद्दल जबाबदार असेल, परंतु अशा जहागीर गांवाच्या संबंधांत
या [illegible] खाद्या न्यायालयानें त्या बाबतींत दिलेल्या मनाई-हुकुमाचें पालन करतांना,
[illegible] यांत आल्यामुळें, यथास्थिति, जहागीरदारानें किंवा कॅडेटनें, नेमलेली
[illegible] न आला असेल अशी तारीख यांमधील कोणत्याहि मुदतीसाठीं अशा
[illegible] ल म्हणून किंवा खंड म्हणून कोणतीहि रक्कम वसूल केली असेल
[illegible] स्थिति, अशा जहागीरदारानें किंवा अशा कॅडेटन, त्यास पोट-कलम
[illegible] रण्यांत आला त्या तारखेपासून, किंवा
[illegible] गीरी रद्द करण्याबाबत) (सुधारणा) अधिनियम, १९५९
[illegible] ला असेल तर अशा प्रारंभाच्या तारखेपासून
[illegible] ल केलेल्या किंवा त्यास मिळालेल्या जमीन महसुलाच्या
[illegible] रास दिली पाहिजे.
[illegible] ण्याबाबत) (सुधारणा) अधिनियम, १९५७ याच्या
[illegible] तर, कंडिका (अ) मधील कोणताहि मजकूर लागू

(२) जहागिरदार किंवा यथास्थिति, कॅडेट, पोट-कलम (१) अन्वयें किंवा पोट कलम (१ अ) अन्वयें त्यानें द्यावयाची कोणतीहि रक्कम राज्य सरकारला देण्यांत कसूर करील तर अशी रक्कम जमीन-महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्याजोगी असेल.

(३) जर मामलतदारास, आपण होऊन, किंवा कोणत्याहि इसमान त्याजकडे केलेल्या अर्जावरून, असें वाटण्यास कारण असेल कीं त्याच्या स्थानिक अधिकारक्षेत्रांतील एखाद्या जहागीर गांवातील कोणत्याहि जमिनीच्या संबंधांत जहागिरदार किंवा कॅडेट यानें पोट-कलम (१) अन्वयें किंवा पोट कलम (१ अ) अन्वयें द्यावयाची रक्कम राज्य सरकारला देण्यांत कसूर केली आहे, तर त्यानें संहितेंत (कोडांत) तरतूद केलेल्या रीतीनें संक्षिप्त चौकशी केली पाहिजे आणि जहागिरदारानें किंवा कॅडेटनें राज्य सरकारला रक्कम देण्यात कसूर केली आहे किंवा नाहीं हें ठरविलें पाहिजे, आणि कसूर केली असेल तर, पोट-कलम (२) अन्वयें जहागिरदाराकडून अथवा कॅडेटकडून वसूल करावयाची रक्कम त्यानें ठरविली पाहिजे. अशा रीतीनें ठरविण्यांत अ.लेली रक्कम यानंतर वसूल करण्यांत येईल.

(४) कलेक्टरनें, कलमें ११, १२, किंवा १४ यांअन्वयें अशा जहागिरदाराला किंवा कॅडेटला देण्यांत येईल अशा नुकसानभरपाईच्या रकमेंतून या कलमाअन्वयें राज्य सरकारला त्यानें द्यावयाची रक्कम बाव करणें कायदेशीर होईल.

(५) सदरील उपबंधांना अनुसरून जहागिरदारानें किंवा कॅडेटनें दिलेल्या किंवा त्याजकडून वसूल केलेल्या रकमा, जहागिरदाराला किंवा कॅडेटला त्या ज्या इसमांकडून मिळाल्या किंवा त्यानें त्या ज्या इसमांकडून वसूल केल्या त्या इसमांच्या जमीनमहसुलाच्या खातीं जमा केल्या पाहिजेत.

**सन १९४८ चा मुंबई अधिनियम ६७, याचे उपबंध जमीनदार व कुळें यांच्यामधील संबंधांना लागू असणें.**

२४, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८, याचे कोणतेहि उपबंध कोणत्याहि जहागीर गांवास किंवा जमीनदार आणि त्याची कुळें यांचे परस्पर हक्क आणि जबाबदाऱ्यां यास ह्या अधिनियमांतील कोणत्याहि उपबंधां मुळें बाध येतो असे समजतां कामा नयें मात्र उक्त उपबंध ह्या अधिनियमाच्या स्पष्ट उपबंधांशी कोणत्याहि रीतीनें विसंगत नसतील तेथवरच ते अशा रीतीनें लागू होण्यास बाध येणार नाहीं.

**नियम.**

२५. राज्य सरकारास, या अधिनियमाचें उपबंध पार पाडण्याच्या कारणासाठीं नियम करण्याचा अधिकार आहे असें नियम आगाऊ प्रसिद्ध करण्याच्या शर्तीस अधीन रहातील व ते कायम करण्यांत येतील तेव्हां, राजपत्रांत प्रसिद्ध केलें पाहिजेत.

**बचाव.**

२६. ह्या अधिनियमांतील कोणत्याहि मजकुरामुळें, विलीन झालेल्या कोल्हापूर संस्थानांतील ज्या गांवांच्या किंवा गांवांच्या गटाचा महसूल, सरंजामी जहागिऱ्या धारण करणारांनीं सरंजाम म्हणून धारण केलेला असेल त्या गांवास किंवा गांवांच्या गटास बाध येणार नाहीं.

J-1493—78-A.